Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 452 – 456
DOI: 10.5281/zenodo.10134161
Original Research Article

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

प्रा. ज्योती उद्धवराव मामडगे

विभाग प्रमुख, संस्कृत विभाग, सरस्वती संगीत कला महाविद्यालय लातूर, ४१३५३१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: jyotimamadge@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधी यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या अहिंसा तत्त्वामुळेच भारताला स्वातंत्र्य मिळाले. ब्रिटिशांच्या विरुद्ध दिलेला मानवी लढा हा भारतीय समाजाच्या बदलासाठी कारणीभूत ठरला. भारतीय राजकारणात गांधीजीचा अवतार झाला नसता तर लोकांनी शस्त्रास्त्रांचा वापर करून भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बऱ्याचशा प्रमाणात हिंसेचा वापर देखील केला असता, परंतु गांधीजीच्या कार्याची प्रेरणा आणि आदर्श भारतीय तरुणांनी समोर ठेवून सत्य आणि अहिंसा या तत्त्वाच्या आधारे स्वातंत्र्याचा लढा चालू ठेवला. अहिंसेच्या मार्गानेच आपल्याला स्वातंत्र्य मिळवायचे, असे गांधीजीचे ठाम मत होते. त्यांनी या अहिंसेचा जो अवलंब केला त्याविषयी विनोबा भावे यांनी देखील महात्मा गांधी विषयी मत मांडते वेळेस ते असे म्हणतात की, भगवान गौतम बुद्धानंतर हा सत्य व अहिंसेचा दुसरा पुजारी होता. म्हणजे ज्याप्रमाणे गौतम बुद्ध यांनी सत्य आणि अहिंसेचा अंगीकार केला त्याचप्रमाणे भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी महात्मा गांधीजी यांनी गौतम बुद्धांकडून प्रेरणा घेऊनच अहिंसेचा अवलंब केला. महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक तत्त्वाचा विचार कुठेतरी व्हावा या निमित्ताने महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार या विषयावर शोधनिबंध लिहिण्याचा हा छोटासा प्रयत्न करत आहे.

महात्मा गांधी यांनी वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेमध्ये शिक्षण विषयक विचार मांडलेले दिसतात. महात्मा गांधी यांची शिक्षण पद्धती ही वर्धा योजना, मूलोद्योगी शिक्षण, बुनियादी शिक्षण व जीवन शिक्षण इत्यादी नावांनी ओळखली जाते. शिक्षणाविषयी गांधीजी म्हणतात की, मी शिक्षण क्षेत्रात अधिकार नसलेला व्यक्ती आहे व शिक्षणाचा जो रुढ व तांत्रिक अर्थ आहे त्यापासून मी अनभिज्ञ आहे.  हा त्यांचा नम्रपणा होता कारण त्यांनी स्वतः म्हटले आहे, मी भारताला अनेक प्रकारच्या गोष्टी दिल्या त्यात वर्धा शिक्षण योजना व शिक्षण पद्धती ही सर्वात महत्त्वाची आहे. त्यांच्या

शिक्षण विषयक तत्त्वज्ञानात निसर्गवाद, अधिवाद, वास्तवाद व कार्यवाद या चारही तत्त्वांचा समन्वय झालेला दिसून येतो. गांधीजींनी समाज शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्री व हरिजन शिक्षण, विद्यापीठ शिक्षण इत्यादी घटकात महत्वपूर्ण कार्य केलेले दिसते. शिक्षण हे समाज बदलाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. समाज जीवनाला नवी दिशा देण्याचे कार्य शिक्षणच करू शकते. हा विचार गांधीजींनी मांडलेला आहे. आजच्या काळातही शिक्षण पद्धती ही वेगवेगळया क्षेत्रात जोर धरू लागलेले आहे. वर्तमान शिक्षण पद्धतीत महात्मा गांधीजीच्या शैक्षणिक विचारांचं बीज यामध्ये रुजलेले दिसते. गांधीजीच्या मते शिक्षण हे फक्त पुस्तकी शिक्षण नको तर शिक्षणामुळे बुद्धी, शरीर, हृदय या तिन्हीचा समतोल विकास साधता आला पाहिजे. म्हणजेच आजच्या शिक्षण प्रणालीचा ढासाळलेला दर्जा महात्मा गांधीजीच्या शिक्षणविषयक विचाराने निश्चितच उंचावल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी गांधीजींच्या विचारांचा अवलंब करणे आजही आवश्यक ठरते.

**महात्मा गांधी यांच्या शिक्षणाची उद्दिष्टे**

**१. स्वावलंबी व स्वयंपूर्णता**

महात्मा गांधी व्यवहारवादी शिक्षण तज्ञ होते. शिक्षणाने स्वतःचा विकास साधून स्वतःची भाकर मिळवता आली पाहिजे. व्यक्तीला शिक्षणामुळे भावी आधार मिळाला पाहिजे, असे मत गांधीजी मांडताना दिसतात. शिक्षणामुळे बुद्धी, कृती व भावना यांचा सारख्या प्रमाणात विकास झाला पाहिजे. शिक्षणाने स्वावलंबी बनवून स्वतःची प्रगती साधता आली पाहिजे हा मुख्य हेतू शिक्षणाचा असावा असे गांधीजींनी महत्त्वं मांडले आहे.

**२. चारित्र्यसंपन्नता**

चारित्र्यसंवर्धन हे एक शिक्षण पद्धतीचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. संस्कृत मध्ये देखील "शीलम् परम् भूषणम् |" चारित्र्य हा मनुष्याचा सर्वश्रेष्ठ अलंकार आहे. शिक्षणाच्या माध्यमातून चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण करणे ही आपली नैतिक जबाबदारीआहे. विद्यार्थ्यांनी नैतिक वृत्ती जोपासणे, हे शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समता, सहिष्णुता व सहकार्याची भावना निर्माण झाली पाहिजे. संस्कृतीच्या ऱ्हासासाठी शिक्षणाचा उपयोग करू नये, असे गांधीजींनी विचार मांडले आहे वर्तमान स्थितीत विचार करता शिक्षण केवळ आर्थिक लाभ मिळविण्यासाठी घेतले जाते. त्यामध्ये समाज परिवर्तनाचा काहीही हेतू नसतो, म्हणून वर्तमान काळात गांधीजींच्या विचारांचा व शैक्षणिक कार्याचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

**३. बालशिक्षण व गांधीजी**

गांधीजी बाल शिक्षणाबद्दल आपले मत मांडताना म्हणतात की, लहान मुलांना मुळाक्षरांची ओळख करून देण्यापेक्षा शिक्षकाने त्याला तोंडी ज्ञान दिले, तर त्याचा अधिक विकास होऊ शकेल. सदरील प्रक्रियेस जास्तीचा वेळ लागला तरी चालेल पण मुलांचे तोंडी ज्ञानामुळे त्यांचे व्यवहारिक ज्ञान वाढविणे सोपे जाईल. लहान वयापासूनच

हस्ताक्षर चांगले असले पाहिजे हा आग्रह गांधीजीचा होता. लहान मुलांचे शिक्षण हे स्त्रिया चांगल्या प्रकारे करू शकतात, असे गांधीजीचे मत आहे. बाल शिक्षणात धार्मिक शिक्षण देण्याचाही आग्रह गांधीजी करतात. गांधीजीचे शिक्षण विषयक विचार हे सर्वतोपरी विकासाच्या दिशेने नेणारे आहेत. आजच्या वर्तमान स्थितीत बालशिक्षणाची अवस्था ही अतिशय वाईट झालेली दिसून येते. इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाने विद्यार्थ्यावर मोठे संकट ओढले आहे. बाल शिक्षणाची प्रगती व सुधारणा होण्यासाठी महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या तत्त्वांचा व विचाराचा अवलंब करावा लागेल.

### ४. गांधीजीचे शिक्षण विषयक विचार

शिक्षकाने विद्यार्थ्याला ज्ञानार्जन करतेवेळी शिक्षकाचा केवळ ज्ञानदान करणे हाच हेतू नसावा, तर त्या विद्यार्थ्यापर्यंत सत्य, सहिष्णुता व सहानुभूती इत्यादी तत्त्व निर्माण करणे, हे कार्य शिक्षकाचे असावे. विद्यार्थी हा पुस्तकांपेक्षा शिक्षकाच्या जीवनातून जास्त शिक्षण घेत असतो. शिक्षकच विद्यार्थ्यांचे खरेखुरी पाठ्यपुस्तक आहे, असे गांधीजींना वाटते. शिक्षक चारित्र्यसंपन्न, गुणवान, श्रद्धावान व प्रामाणिक असला पाहिजे. शिक्षणातून शिस्त आली पाहिजे. नाहीतर शिक्षणावरचा खर्च व वेळ व्यर्थ जातो, असे गांधीजींचे मत आहे. शिक्षकाशिवाय ज्ञानग्रहण करणे अशक्य आहे. शिक्षकाचा आदर्श विद्यार्थ्यांना असावा. आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षका विषयीचा आदर्श लोप पावत चाललेला दिसून येतो. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर दिला जात असून दर्जेदार व वास्तविक वस्तुनिष्ठ शिक्षण आज वर्तमान स्थितीत क्वचितच पाहायला मिळते. आज खऱ्या अर्थाने गांधीजींच्या शैक्षणिक विचाराचे स्मरण करणे अतिशय महत्त्वाचे ठरते.

### ५. गांधीजी आणि स्त्री शिक्षण

स्त्री व पुरुष असा निसर्गाने भेद ठेवलेला आहे, तरी देखील स्त्रियांना गृह व्यवस्था, मुलांना सांभाळणे, स्वच्छता राखणे, स्वयंपाक घरात काम करणे याविषयी शिक्षण दिले पाहिजे. स्त्री व पुरुष यांचा दर्जा समान आहे हे मुख्य सत्य समोर ठेवून स्त्री शिक्षणाच्या वेगवेगळया प्रभावी योजना आखल्या पाहिजे, असे गांधीजी म्हणतात. भारतातील स्त्री ही रुढी व अन्याय यामुळे निरक्षर राहिली असून, त्यांच्या निरक्षरतेला पुरुष व त्यांचा आळस हे देखील कारणीभूत आहे. संस्कारीत करण्यासाठी स्त्रियांना ज्ञानाची गरज आहे. सुशिक्षित स्त्रियांनी पाश्चात्यांचे अंधानूकरण न करता योग्य शिक्षण, सदाचार,पावित्र्य  व संयमशील वर्तन करावे, असे गांधीजीचे मत होते. आज स्त्री शिक्षणाचा मोठा प्रचार व प्रसार झाला असून स्त्रिया वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती करू लागल्या आहेत. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग हा मोलाचा झाला आहे. हे सर्व महात्मा गांधीजींच्या विचारांचे फलित म्हटले पाहिजे.

### ६. प्रौढ शिक्षण व गांधीजी

भारतातील अंधश्रद्धा, निरक्षरता, अज्ञान, व्यवहारिक ज्ञानाची कमतरता, आरोग्य विषयीचे विचार इत्यादी गोष्टीच्या आधारावर गांधीजी प्रौढ शिक्षणाचा आग्रह धरतात. निरक्षरता हा देशातील कलंक आहे. प्रौढांना विविध

क्षेत्रातील ज्ञान मिळावे जसे- आकडेमोड, भूगोल, इतिहास, आरोग्यशास्त्र, भाषा विषयी ज्ञान लिहिणे - वाचणे इत्यादी गोष्टीचे ज्ञान असले पाहिजे. स्वराज्याच्या निर्मितीसाठी लोकशिक्षण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सुट्टीच्या काळात ग्रामीण भागात जाऊन प्रौढ शिक्षणाचे कार्य करावे व ग्रामीण भागातील लोकांना शिक्षणाच्या चौकटीत आणावे, ही त्या मागची भूमिका असावी. ब्रिटिश शिक्षण पद्धतीमुळे आपली कल्पना शक्ती, सर्जन शक्ती नष्ट झाली असून भारतीय शिक्षणाचा विकास खुंटला आहे. इंग्रजी शिक्षण घेऊन आपण गुलाम बनविले आहे, असे गांधीजींना वाटत असेल आजच्या वर्तमान स्थितीत प्रौढ शिक्षणाची तेवढी आवश्यकता नाही, कारण सध्याच्या काळामध्ये शिक्षणाचे महत्त्व सर्वांनाच समजले आहे, त्यामुळे सर्वच शिक्षण घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

**७. लैंगिक शिक्षणाविषयी मत**

कामवासणा ही एक नैसर्गिक भावना आहे तिचा दुरुपयोग करणे हा मोठा गुन्हा आहे. तरुण वयातील मुला - मुलींना ज्ञानेन्द्रियांचे कार्य व त्याचा उपयोग याबद्दल माहिती देणे गरजेचे आहे. त्यांना योग्य वेळी योग्य ती माहिती देणे आवश्यक आहे. काम विज्ञानाची माहिती देणे गरजेचे आहे. सध्याच्या इंटरनेटच्या युगामध्ये आपण पाहतो की विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षण न दिल्यामुळे ते चुकीच्या व्हिडिओद्वारे चुकीची माहिती पाहतात आणि त्याचे परिणाम वाईट होत असताना दिसत आहेत त्यांना योग्य वेळी योग्य ती माहिती देणे आवश्यक आहे कामविद्यानाची माहिती अधिकारी व्यक्तीकडून द्यावी असे गांधीजींना वाटत होते लैंगिक शिक्षणामुळे कामवासनेवर जय मिळविता येतो असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही.

**८. अभ्यासक्रमातील विषय**

शिक्षण क्षेत्राची प्रगती साधण्यासाठी व विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व्यायाम, खेळ, व्यवसाय, चित्रकला व संगीत याविषयीचे शिक्षण देणे गरजेचे असले पाहिजे. पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासक्रमात याविषयीचे मुद्दे असले पाहिजे, जेणेकरून विद्यार्थ्यांना आपला सर्वांगीण विकास करता येईल. उच्च शिक्षणामध्ये उद्योग, व्यापार, तांत्रिक कला, उच्च साहित्य, विविध प्रकारची शस्त्रे अशा वेगवेगळया गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमात असला पाहिजे, असे मत गांधीजीचे होते. आजच्या कालखंडात शिक्षण क्षेत्रातील पारंपारिक पद्धत वेगळी करून तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर दिला पाहिजे.

**वर्धा शिक्षण योजनेची तत्वे**

१. 7 ते 14 वर्षापर्यंतचे शिक्षण सक्तीचे मोफत असावे.
२. शिक्षण हे मातृभूमीतून दिले जावे.
३. शिक्षण कोणत्यातरी उत्पादक उद्योगाच्याद्वारे दिले जावे.
४. उत्पादक उद्योगातून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सुटावा ही योजना कृती केंद्रित असल्यामुळे ती मानसशास्त्रीय तत्वांशी अधिक सुसंगत असल्याचे दिसते.

**विद्यापीठीय शिक्षण व महात्मा गांधी**

महात्मा गांधीजी उच्च शिक्षणाचे कार्य करणाऱ्या विद्यापीठातील शिक्षणाविषयी भूमिका मांडतात. महाविद्यालय व विद्यापीठे ही पवित्र मंदिरे आहेत. ती चारित्र्य संवर्धनाची केंद्रे असली पाहिजे. उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांनी काहीतरी समाज उपयोगी व नाविन्य शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे गांधीजीचे विचार होते. आज उच्च शिक्षणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदललेले आहे. उच्च शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्यापुरते मर्यादित झाले असून समाज परिवर्तनाची उद्दिष्टे शिक्षण प्रणालीतून नाहीशी झालेली दिसत आहेत. म्हणूनच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात महात्मा गांधीजींची भूमिका ही समाजकेंद्री दिसून येते. महात्मा गांधीजीच्या शिक्षणाविषयीच्या विचाराला त्यांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान लाभलेले दिसते.

**निष्कर्ष**

महात्मा गांधीजी यांची शिक्षण व्यवस्था व शैक्षणिक विचार आजच्या वर्तमान स्थितीत स्वीकारल्यास समान परिवर्तन होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकेल. गांधीजींची शिक्षण प्रणाली ही व्यवसाय अभिमुख असल्याचे दिसून येते. महात्मा गांधीजी यांचे शिक्षणासंबंधीचे विचार हे बहुजन केंद्रीय असून समाज उपयोगी असल्याचे दिसते. शिक्षणाचा उद्देश केवळ पाठ्यपुस्तक वाचणे नसून त्यामधून शरीर, बुद्धी, आरोग्य यांची वृद्धी करता यावी असे दिसते. गांधीजींची शिक्षण पद्धती ही भारतीय संस्कृतीला स्वावलंबी, सज्ञानी, सक्षम व सतेज बनविणारी होती. गांधीजींचे शिक्षण विषयक विचार हे विद्यार्थी केंद्रीय असून विद्यार्थ्यांचे हित जोपासणारे असल्याचे दिसते. चांगल्या बदलाची सुरुवात आधी स्वतः पासून करा आपल्याला या जगात हवा असलेला बदल पाहण्यासाठी आपण स्वतः तो बदल करणे आवश्यक आहे

**संदर्भ सूची**


१. बी. एल. ग्रोवर, एन. के. बेल्हेकर, आधुनिक भारत एस चंद्र प्रकाशन नवी दिल्ली.

२. डॉ. अण्णा साहेब गरुड, डॉ. बी.बी. सावंत महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास कैलास प्रकाशन औरंगाबाद.

३. सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपा नेरकर - असा घडला भारत, रोहन प्रकाशन पुणे

४. डॉ. जयसिंगराव पवार– आधुनिक भारत - अरुंधती प्रकाशन कोल्हापूर.

५. साहेबराव गाठाळ – आधुनिक भारतीय विचारवंत कैलास प्रकाशन औरंगाबाद

६. राम मनोहर लोहिया – समाजवाद काळा व गोरा